**पुणे पत्रकार सहकारी गृहरचना संस्था (मर्यादीत)**

**सिंधु इमारत, पत्रकार नगर, पुणे ४११०१६**

**दिनांक**

**१८.०६.२०२३**

प्रति,

प्रिय सभासद बंधू भगिनींनो,

पुणे पत्रकार सहकारी गृहरचना संस्था मर्या

सेनापती बापट रोड,

शिवाजीनगर, पुणे.

विषय ३ निवडक विकसकांचे सादरीकरण

पंचसमिती व पुनर्विकास समितीने प्राप्त झालेल्या सर्व निविदांचा विचार करून गुणवत्ता, स्पर्धात्मक वर, अनुभव व व्यावसायिक प्रतिष्ठा या गोष्टी तपासून ०३ विकसक निवडले आहेत / short list केले आहेत. त्याची माहिती ही आपल्यापर्यंत पंचसमिती वेगवेगळ्या माध्यमांतून पोहोचवत आहेच. तरी सदर निवडक ३ विकसकां पैकी १ विकसक सभासदांच्या सहमतीने / पसंतीने गुप्त मतदान करून निवडणे आहे. त्याकरीता दि. २५.०६.२०२३ रोजी सायंकाळी ४.०० वाजता विशेष सर्वसाधारण सभा आयोजित केली आहे. सदर विशेष सर्वसाधारण सभेकरीता सर्व सभासदांनी प्रत्यक्ष उपस्थित राहणेचे आहे.

तसेच, सभासदांना निर्णय घेणेकरीता ३ निवडक विकसकांचे सादरीकरण विशेष सर्वसाधारण सभेच्या आधी आयोजित केले आहे. खालीलप्रमाणे ३ निवडक विकसक संस्थेच्या सभासद तसेच त्यांच्या कुटूंबियांसमोर त्यांची ऑफर व इतर आवश्यक माहितीचे सादरीकरण करणार आहेत.

स. ९.३० ते ११.०० मॅजेस्टीक लँडमार्क ग्रुप

स. ११.३० ते दु. १.०० न्याती सुप (न्याती शुभम EPC निर्माण डेव्हलपर्स) ग्रुप + +

दु. २.०० ते ३.३० कोहीनूर ग्रुप

वरील सादरीकरणासाठी सभासद स्वतः तसेच त्यांचे कुटूंबिय यांनी उपस्थित रहावे. याकरीता सकाळी ९.०० वाजता संस्थेशेजारील मुनोत सभागृहातच ही व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच सभासदांनी स्वतःचे व कुटूंब सदस्य याचे confirmation दि. २०.०६.२०२३ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात द्यावे. ज्या सभासदांना प्रत्यक्ष उपस्थित राहण्यास अडचण आहे त्यांनी संस्थेच्या सचिवांकडे प्रत्यक्ष संपर्क साधावा ही विनंती.

दुपारी ३.३० वाजता सर्व विकसकांचे सादरीकरण झालेनंतर सभासदांचे काही प्रश्न असल्यास त्याचे निराकरण संस्थेचे सल्लागार करतील. सदर कार्यक्रमासाठी चहापान व जेवण याची व्यवस्था करण्यात आली आहे.

संध्याकाळी ४.०० वाजता विकसक निवडण्याची विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली आहे. सदर विशेष सर्वसाधारण सभेस केवळ सभासद किंवा सहयोगी. सभासद यांनाच प्रवेश आहे. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. विशेष सर्वसाधारण. सभेस उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे (१) येथील प्राधिकृत अधिकारी उपस्थित राहणार असून त्यांचेसमा संस्थेच्या सभासदांनी गुप्त मतदान करून संस्थेच्या पुनर्विकसना करीता एक विकसक बहुमताने निवडणेचा आहे.

तरी सदर सादरीकरण बघण्यासाठी येणाऱ्या सर्व सभासदांनी उपस्थितीची माहिती / confirmation संस्थेच्या कार्यालयात दि. २०.०६.२०२३ पर्यंत द्यावी जेणेकरून आसनव्यवस्था करणे संस्थेला सोईचे होईल.

विनायक पटवर्धन (चिटणीस)